# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक
दिनांक – १५ फेब्रुवारी २०१६

# मुंबई विद्यापीठ देणार इस्त्रायलमध्ये मराठीचे धडे

## राज्य मराठी विकास संस्था ,मुंबई विद्यापीठ आणि तेल – अवीव विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार

मुंबई – अनिवासी भारतीय तसेच भारताबाहेर स्थायिक झालेल्या भारतीय वंशाच्या लोकांशी सांस्कृतिक वीण घट्ट करून ठेवण्याच्या उद्देश्याने मुंबई विद्यापीठाने एक पाऊल पुढे टाकत, इस्त्रायलमधील तेल- अवीव विद्यापीठाशी सामंजस्य करार करून,मुंबई विद्यापीठामार्फत आता इस्त्रायलमध्ये मराठीचे धडे गिरविले जाणार आहेत.आज मुंबई विद्यापीठ,राज्य मराठी विकास संस्था आणि तेल-अवीव विद्यापीठ यांच्यात शैक्षणिक सामंज्यस करार करण्यात आला. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.संजय देशमुख,राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक प्रा.आनंद काटीकर आणि तेल अवीव विद्यापीठाचे उपाध्यक्ष रानान रईन यांच्यात हा शैक्षणिक सामंजस्य करार करण्यात आला.यावेळी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री विनोद तावडे आणि इस्त्रायलचे काऊन्सेल जनरल डेव्हिड अकोव हे उपस्थित होते.

आजमीतीस इस्रायलमध्ये स्थलांतरीत झालेल्या पिढीने मराठी भाषा आणि संस्कृती टिकवून ठेवली असून इस्रायलमध्ये मायबोली हे नियतकालिक प्रसिद्ध होते, दरवर्षी महाराष्ट्र दिन साजरा केला जातो, तसेच गाजलेल्या मराठी नाटकांचे प्रयोग तेथे आयोजित केले जातात. १९९६ साली जागतिक मराठी संमेलनाचे आयोजन इस्रायलमध्ये करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर मायमराठीच्या अभिवृध्दीसाठी हा एक महत्वाकांक्षी प्रकल्प समजला जातो.

इस्रायली विद्यापीठांत संस्कृत, हिंदी तसेच मल्याळम भाषा शिकण्याची सोय आहे मात्र,मराठी शिकण्याची सोय आजवर उपलब्ध नसल्याने २०१५ साली, महाराष्ट्र शासनाने अशा प्रकारचा प्रयत्न झाल्यास त्याला मदत करायची तयारी दाखवली होती,त्याच जोडीला जगातील आघाडीच्या १५० विद्यापीठांपैकी एक असलेल्या तेल अवीव विद्यापीठाने महाराष्ट्र शासनाच्या तसेच राज्यातील विद्यापीठांच्या मदतीने त्यांच्याकडे मराठीचा अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शवली होती. दरम्यान  मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांनी सप्टेंबर २०१५मध्ये तेल-अवीव विद्यापीठाला भेट दिली तेव्हा अशा प्रकारच्या उपक्रमात मुंबई विद्यापीठ सहभागी होऊ शकेल असे त्यांनी सांगितले होते,त्या पार्श्वभूमीवर राज्य मराठी विकास संस्थेने मुंबई विद्यापीठ आणि तेल-अवीव विद्यापीठासह इस्रायलमध्ये प्रायोगिक तत्वावर १ महिन्याचा मराठी भाषेचा अभ्यास वर्ग उपलब्ध करून देण्याच्या प्रकल्पात सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे.

या अभ्यास वर्गासाठी इस्रायलला जाणारे प्राध्यापक मुंबई विद्यापीठाचा मराठी विभाग किंवा विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमधून निवडले जातील तर  राज्य मराठी विकास संस्थेकडून या वर्गाचा अभ्यासक्रम ठरणिण्यात येणार आहे तर तेल-अवीव विद्यापीठाकडून या अभ्यासक्रमाचा प्रशासकीय भाग पाहण्यात येईल तसेच प्राध्यापकांना निवास व्यवस्था अनुदानित स्वरूपात उपलब्ध

करून देण्यात येणार आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना प्रमाणपत्र आणि २ क्रेडिट देण्यात येतील. या वर्गाची प्रायोगिक सुरुवात म्हणून २०१६ सालच्या (इस्रायलमधील) उन्हाळी सुट्ट्यांच्या कालावधीत करण्यात येणार आहे.

राज्य मराठी विकास संस्थेच्या सहकार्याने मुंबई विद्यापीठाने हा अभिनव प्रकल्प हाती घेतला असून.या महत्वाकांक्षी प्रकल्पाअंतर्गत इस्त्रायलमध्ये स्थलांतरीत झालेल्या मराठी पीढीमध्ये मराठी भाषा आणि संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी आणि मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करून मराठी  भाषेच्या अभिवृध्दीची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी यामुळे हातभार लागणार आहे.  भारताबाहेर मराठी भाषिक लोकांची जिथे अधिक वस्ती आहे अशा ठिकाणच्या विद्यापीठांमध्ये मराठी भाषा शिकण्याची सोय उपलब्ध करून देत तेथील मातीत जन्मलेल्या मराठी पिढीची महाराष्ट्राशी असलेली सांस्कृतिक नाळ जोडून ठेवण्यासाठी मुंबई विद्यापीठ आणि राज्य मराठी विकास संस्था यांनी हा पुढाकार घेतला आहे.

१९४८ साली इस्रायलची स्थापना झाल्यावर प्रामुख्याने मुंबई, ठाणे, रायगड आणि पुणे जिल्ह्यात दोन हजार वर्षांपूर्वी स्थायिक झालेली आणि मराठी ही मातृभाषा असलेली सुमारे पंचवीस ते तीस हजार बेने इस्रायली ज्यू लोकं इस्रायलमध्ये प्रामुख्याने १९६० आणि ७० च्या दशकात स्थायिक झाली.कालपरत्वे आता त्यांची संख्या वाढून ७५ ते ८० हजाराच्या घरात असून ती इस्रायलच्या लोकसंख्येच्या १% एवढी आहे.असे असले तरी, इस्रायलच्या मातीत जन्मलेल्या या लोकांच्या पुढच्या पिढ्या मातृभाषा म्हणून हिब्रू बोलतात.त्यामुळेही या प्रकल्पाचे महत्व अधोरेखित होते.

हा प्रयोग यशस्वी झाल्यास अन्य देशांतील ज्या शहरांमध्ये मराठी भाषिकांची संख्या लक्षणीय आहे, तेथे अशा प्रकारचा अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्याबाबत पुढाकार घेण्यात येणार असून अशा  या अभिनव आणि महत्वाकांक्षी प्रकल्पाच्या मदतीने व्यापार, गुंतवणूक, शिक्षण, कला इ. द्वारे परराष्ट्र संबंध मजबूत करण्याच्या प्रक्रियेला पाठबळ लाभणार असल्याचा आशावाद व्यक्त केला जात आहे.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)